# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com





आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष–२ ■ अंक–१० ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १० ऑक्टोबर २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# दिवा-आगासन रस्त्यावर वाढते अपघात

## महापालिका प्रशासन लक्ष देईल का?

▶ विशेष प्रतिनिधी

**दिवा:**–दिवा शहरातील प्रमुख रस्ता असणाऱ्या दिवा आगासन या रस्त्यावर मागील काही महिन्यात अपघातांची मालिका सुरूच आहे. या रस्त्यावर होणाऱ्या अपघातामुळे नागरिकांना जीव गमवावा लागला आहे.मागील वर्षभरात या रस्त्यावर तीन निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. आधीच अरुंद असणारा रस्ता त्यात दुतर्फा बसवण्यात आलेले फेरीवाले यामुळे नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन रस्त्यावरून चालावे लागते. दुसरीकडे फेरीवाल्यांनी रस्ता व्यापल्याने वाहने चालवण्यासाठी सुद्धा अपुरी जागा उपलब्ध असते.यातून अपघाताची शक्यता अधिक असते.मुख्य रस्त्यावरील फेरीवाले दिवा प्रभाग समिती मधील अधिकारी का हटवत नाहीत हा प्रश्न आहे.

नुकताच एका तरुणाचा ट्रक खाली येऊन अपघाती मृत्यू झाला. याआधी गणपती उत्सवाच्या तोंडावर एका तरुणाला जीव गमवावा लागला.यातून बोध घेऊन पालिका प्रशासन नागरिकांच्या जीविताची काळजी म्हणून काही उपाययोजना करणार आहे की नाही हा महत्त्वाचा प्रश्न आहे.या रस्त्यावर एकही गतिरोधक टाकण्यात आलेला नाही. एस एम जी स्कुल,दातीवली चौक,सिद्धिविनायक गेट ,गणेश नगर या भागात गतिरोधक टाकण्याची आवश्यकता आहे.वाढते अपघात रोखण्यासाठी पालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.



मुख्य रस्त्यावरील फेरीवाले दिवा प्रभाग समिती मधील अधिकारी का हटवत नाहीत हा प्रश्न आहे.नुकताच एका तरुणाचा ट्रक खाली येऊन अपघाती मृत्यू झाला. याआधी गणपती सणाच्या तोंडावर एका तरुणाला जीव गमवावा लागला.यातून बोध घेऊन पालिका प्रशासन नागरिकांच्या जीविताची काळजी म्हणून काही उपाययोजना करणार आहे की नाही

## वाढत्या अपघातांबाबत मराठा संघाचे पोलिसांना निवेदन



**दिवा** – शहरात वाढत्या अपघातांकडे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मराठा संघाने दिवा प्रभाग समिती, मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे मनपा आयुक्त व ठाणे वाहतूक विभागास निवेदन दिले आहे.

दिवा शहरात दिवा रेल्वे स्टेशन परिसर ते दिवा- आगासन चौक येथे नियमित ट्रॅफिकची समस्या नागरिकांना भेडसावत असते. दुकानदारांचा व फेरीवाले यांचा पदपथावरील कब्जा यामुळे होणारे वारंवार अपघात. यामुळे सामान्य नागरिकांना जीव मुठीत घेऊन वाटचाल करावी लागत आहे. नुकतेच दिनांक ०६/१०/२२ रोजी दिवा शिळ रोड वर असाच एक अपघात होऊन एकाचा मृत्यू झाला. मागील काही महिन्यात अशा कित्येक समस्या घडलेल्या आहेत. या समस्यांवर तातडीने उपाय व्हावा व अशा सगळ्या घटना लवकरात लवकर आटोक्यात याव्यात याकरिता भारतीय मराठा संघ आक्रमक झाला आहे. याप्रसंगी भारतीय मराठा संघ संस्थापक अध्यक्ष अविनाश पवार, प्रदेश सचिव एस डी पाटील, उपाध्यक्ष दीपक पालांडे, ठाणे महानगर संपर्क प्रमुख अरुण फणसे, उद्योग आघाडी उपाध्यक्ष दिलीप लटके व दिवा शहर अध्यक्ष निकेश खानविलकर आणि इतर अनेक कार्यकर्त्यांनी निवेदन दिले.

## माजी महापौरांवर आक्षेपार्ह टीका; १३ जणांवर गुन्हा दाखल

**ठाणे :** शिवसेनेच्या शिंदे गटाचे प्रवक्ते व ठाण्याचे माजी महापौर नरेश म्हस्के यांच्यावर रॅलीमध्ये आक्षेपार्ह घोषणाबाजी केल्याप्रकरणी १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दसरा मेळाव्यासाठी शिवतीर्थावर जाताना ठाकरे गटातील काही कार्यकर्त्यांनी ठाणे रेल्वे स्थानक परिसरात ही घोषणाबाजी केली होती. त्याचे समाजमाध्यमांवर तीव्र पडसाद उमटले होते. अखेर याप्रकरणी शुक्रवारी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## ठाण्यात पाच तासात ४७.४९ मिमी पावसाची नोंद

**ठाणे :** मोठ्या विश्रांती नंतर शुक्रवारी हजेरी लावणाऱ्या पावसाने दुपारच्या बारा वाजण्याच्या सुमारास बरसण्यास सुरुवात केली. तर दुपारी साडेचार वाजेपर्यंत म्हणजे पाच तासात ४७.४९ मिमी पावसाची ठाणे शहरात नोंद झाली. अचानक सुरु झालेल्या पावसाने शाळकरी मुलांसह चाकरमान्यांची चांगलीच तारांबळ उडाली होती. तर, शहरातील अनेक सखल भागात पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. ठाणे शहरात शुक्रवारी १२.३० ते २.३० या तीन तासाच्या कालावधीत १६.५७ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. तर, २.३० ते ३.३० या एका तासात २७.९४ मिमी पाऊस पडल्याने मागील पाच तासात ४७.४९ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली. कोसळलेल्या पावसामुळे ठाण्यातील मुख्य बाजार पेठेत गुडघाभर पाणी साचले होते. तर, वंदना डेपो भागातील रस्त्यावर पाणीच पाणी साचले होते. तसेच श्रीनगर वागळे इस्टेट भागातील नाला ओव्हर फ्लो झाल्याने देवरथी बंगल्याच्या आवारात पाणी साचल्याची घटना घडली.

## ठाण्यात दरवाजा बंद झाल्याने अडकलेल्या आजोबांची सुखरूप सुटका

**ठाणे:** ढोकाळी येथे शेल इमारतीच्या १२-व्या मजल्यावरील रूम अडकलेल्या ८२ वर्षीय सुभाष गुप्ते नामक आजोबांची सुखरूप सुटका करण्यात ठामपाच्या अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागांना यश आले आहे. सुखरूप सुटका केल्यानंतर त्या आजोबांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले. हा प्रकार शुक्रवारी दुपारी पावणेपाच वाजण्याच्या सुमारास घडला होता.

ढोकाळी येथील तळ अधिक १७ मजली शेल इमारतीच्या १२-व्या मजल्यावरील रूम गुप्ते नामक ८२ वर्षीय आजोबा अडकल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तसेच या विभागांनी दरवाज्याचे लॉक तोडून रूममध्ये अडकलेल्या आजोबांची सुखरूप सुटका केली आणि, त्यांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले. अडकलेले आजोबा हेच त्या घराचे मालक असून घराचा मुख्य दरवाजा लॉक झाल्याने ते अडकले होते, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## सर्वसामान्यांची कामे आपण तन्मयतेने करतो का, यावर संस्थेचे यशापयश अवलंबून'
## ४०व्या वर्धापन दिन सोहळ्यात आयुक्त अभिजीत बांगर यांचे प्रतिपादनर

**ठाणे :** ज्याच्यासाठी कोणीही सोबत येणार नाही, असा सर्वसामान्य माणूस मला भेटू शकतो का आणि त्याचे काम मी किती तन्मयतेने करतो, यावर संस्थेचे यशापयश अवलंबून आहे. आपल्या संस्थेत फक्त आयुक्तच नव्हे तर प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी या भावनेने काम करू लागला, तर ती आपली ओळख ठरेल, तशी ती ठरावी, अशी अपेक्षा महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी शुक्रवारी ठाणे महापालिकेच्या ४०व्या वर्धापन दिन सोहळ्यात अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी संवाद साधताना व्यक्त केली.

ठाणे महापालिकेच्या वर्धापन दिनाचा दुसरा टप्पा शुक्रवारी गडकरी रंगायतन येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात, पालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांनी विविध



कार्यक्रम सादर केले. मध्यंतरानंतर, झालेल्या सोहळ्यात महापालिकेने आयोजित केलेल्या गणेश दर्शन स्पर्धेतील विजेत्यांना माजी उप महापौर पल्लवी कदम, माजी सभागृह नेते अशोक वैती, माजी नगरसेविका अनिता गौरी, मंगल कांबळे, आयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

त्यानंतर, संवाद साधताना आयुक्त बांगर यांनी, अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यक्रमाबद्दल कौतुक केले. त्याचवेळी, वर्धापन दिनाच्या निमित्ताने महापालिका म्हणून आपली कर्तव्य काय हे पुन्हा अधोरेखित केले.यावेळी महापालिकेचे काम सगळ्यात आव्हानात्मक असते. चांगले काम केले तर त्यावेळी कौतुक होईल, वाईट काम केले तर टीकाही ठरलेली आहे. आपली रोज परीक्षा असते, त्यामुळे आपण आत्मसंतुष्ट होता कामा नये, प्रत्येक दिवस नवीन मानून काम करायला हवे, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

कोविड काळात आपण मनापासून काम केले. त्यात काही त्रुटी असल्या तरी कार्यक्षमता दाखवून दिली. ती कार्यक्षमता आपल्या दैनंदिन कामातही, वर्तनाही दिसावी, अशी अपेक्षा आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसाठी जशी तन्मयता दाखवली ती वर्षभर कायम राखावी, अशी माझी रास्त अपेक्षा आहे, असे आयुक्त बांगर म्हणाले.

### कर्मचारी समस्या सोडविण्यास प्राधान्य

**पालिकेतील कर्मचारी विशेषत: वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांच्या समस्या प्रलंबित असतात. प्रशासन म्हणून माझ्या पूर्ण कार्यकाळात त्या समस्या प्राधान्याने सोडविण्यास मी बांधील आहे, असे आयुक्तांनी सांगताच, उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com









## दिवा विकास प्रतिष्ठान तर्फे पुरस्कार सोहळा संपन्न

दिवा शहरातील सर्वात मोठा गरबा – दांडिया महोत्सव सद्गुरू नगर येथे पार पडला. या कार्यक्रमात गरबा दांडिया रसिकांसाठी लकीड्रॉ चे आयोजन करण्यात आले होते.विजेत्यांचा सन्मान माजी नगरसेवक व दिवा विकास प्रतिष्ठान चे अध्यक्ष शैलेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

## मंत्री रवींद्र चव्हाण आयोजित नवरात्री उत्सवातील विजेत्यांना शिवाजी आव्हाड यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण



**डोंबिवली:–** महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम, तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री नामदार रविंद्र चव्हाण आयोजित, महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सव नमो रमो नवरात्री २०२२. विजेत्यांना सन्मान चिन्ह व पारितोषिक वाटप समारंभ पार पडला. यावेळी भाजप भटके विमुक्त आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस शिवाजी आव्हाड,पोलीस सहाय्यक आयुक्त डोंबिवली कुऱ्हाडे,भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांतजी कांबळे ,पोलीस निरीक्षक पवार ,ग्रामीण भाजपा अध्यक्ष श्री नंदू परब जिल्हा सचिव रवी सिंग ठाकूर ,श्री दिनेश जाधव, श्री उमेश पाटील इतर मान्यवर उपस्थित होते.

## आमदार निरंजन डावखरे यांच्या निधीतून दिव्याला मिळाले ई टॉयलेट,८० बसण्याची बाकेही नागरिकांना सुपूर्द




**दिवा:–** भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून ठाणे शहर जिल्हाध्यक्ष व कोकण पदवीधर आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते दिवा येथे पहिल्यांदाच डावखरे यांच्या आमदार निधीतून ई टॉयलेट व बसण्यासाठी बेंचेस देण्यात आल्या.

दिवा शहरात पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी भाजपने अनेक वेळा आवाज उठवला आहे.दिव्यात सार्वजनिक सौचालय नसल्याने अनेकांची गैरसोय होत होती .नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी आमदार निरंजन डावखरे यांनी आपल्या आमदार निधीतून ई टॉयलेट उपलब्ध करून दिले आहे.या टॉयलेट चे लोकार्पण नुकतेच पार पडले. यावेळी ठाणे शहर संघटक सरचिटणीस विलासजी साठे दिवा मंडल अध्यक्ष रोहिदास मुंडे ठाणे शहर जिल्हा ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष विनोद भगत ठाणे शहर कार्यकारणी सदस्य अशोक पाटील विजय भोईर गणेश भगत मंडल सरचिटणीस दिलीप भोईर समीर चव्हाण युवराज यादव युवा मोर्चा अध्यक्ष सचिन भोईर महिला मोर्चा अध्यक्षा ज्योती पाटील ओबीसी मोर्चा अध्यक्ष रोशन भगत उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष अजय सिंग व्यापारी सेल अध्यक्ष जयदीप भोईर अंकुश मढवी वार्ड अध्यक्ष नागेश पवार प्रकाश पाटील राजश्री मुंडे सीमा भगत मृणाल भगत अमरनाथ गुप्ता अवधराज राजभर निलेश भोईर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## खेड तालुका रहिवासी संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन




**दिवा:–** दिवा शहरातील बी.आर. नगर, येथे खेड तालुका कोकण रहिवासी मंच, दिवा संघटनेच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ संघटनेचे अध्यक्ष सतीश निकम, यांच्या शुभहस्ते रिबीन कापून करण्यात आला. तसेच मंडळाचे सचिव  निलेश पाटणे, खजिनदार  मंगेश शेलार, संपर्कप्रमुख  प्रवीण उत्तेकर आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या उद्घाटनाला कोकण प्रतिष्ठान, दिवा या संघटनेचे माजी अध्यक्ष देवदत्त घाडी, सचिव पडयार व तन्वी फाउंडेशनच्या अध्यक्षा ज्योतीताई पाटील, पाटीलबाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष व समाजसेवक नवनीत पाटील व समाजसेविका सविता घाटवल, प्रकाश पाटील, वीरेंद्र निकम, बालाजी कदम, वंचित बहुजन आघाडीचे मिलिंद गवई व नगरसेवक हिरा पाटील, शैलेश पवार, मेघना निलेश पाटणे, संजिवनी संदेस कदम, रिया रोशन आंब्रे मान्यवर उपस्थित होते.

## ज्योती पाटील आयोजित नवरात्र निमित्त उत्कृष्ट खाद्य पदार्थ स्पर्धेला दिव्यातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दिवा:–**भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा व तन्वी फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित नवरात्र निमित्त महिलांसाठी विशेष उत्कृष्ट खाद्यपदार्थ स्पर्धा ज्योती पाटील यांनी आयोजित केली होती. या स्पर्धेत शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

दिवा शहरातील महिलांच्या पाककला विषयक कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या अध्यक्ष ज्योती पाटील यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस भटकविमुक्त आघाडी सेलचे शिवाजी आव्हाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्पर्धेत भाग



घेणाऱ्या महिलांनी घरून बनवून आणलेल्या खाद्य पदार्थांचे परीक्षकांनी परीक्षण केल्यानंतर क्रमांक काढण्यात आले. उत्कृष्ट पदार्थ बनवणाऱ्या महिलांना यावेळी सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे ठाणे जिल्हा कार्यकारणी सदस्य विजय भोईर,भाजपा शहर अध्यक्ष रोहिदास मुंडे, दिवा शहर सरचिटणीस समीर चव्हाण,युवराज यादव,माजी मंडळ अध्यक्ष सुधीर म्हात्रे, प्रवीण पाटील,भाजप व्यापारी सेल अध्यक्ष जयदीप भोईर, डॉक्टर विद्यासागर दुबे, याचबरोबर आयोजक येथे ज्योती पाटील, संगीता भोईर, निर्मला भोईर, अलका म्हात्रे, श्रेया परब, उज्वला चव्हाण,कोमल सावंत, अनिता तांबे आदी महिला उपस्थित होत्या. विजेता ठरलेल्या महिलांना बक्षीस सोन्याची अंगठी, मानाची पैठणी,  डिनर सेट पाच किलो सिटलचा डबा व घरगुती लागणार रेशन सामान देण्यात आले. या स्पर्धेत विजेत्या महिला – रिया मोरे, मनीषा परब, अर्पणा पाटील, मयुरी बेलनेकर, वैभवी गुळेकर, रश्मी मिस्त्री, सुमिता कोठारी, प्रणाली नाईक, शुभ्रा बने, करुणा म्हात्रे, सुनीता राजभर, अनिता लंगडे,सुषमा बुबेरा,मंगल सकटे.

# कळवा खाडीवरील नव्या पुलाची राष्ट्रवादी पाठोपाठ मनसेकडून पाहणी

## एक मार्गिका खुली करण्याची मागणी

**ठाणे** : नवरात्रोत्सवात कळवा खाडीवर उभारण्यात आलेल्या नव्या पुलाची एक मार्गिका खुली होईल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी माजी मंत्रांना दिले होते. मात्र अद्यापही ती मार्गिका खुली न झाल्याने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी मंत्री तथा आमदार डॉ जितेंद्र आव्हाड यांनी मंगळवारी अचानक भेट देत, पुलाच्या कामाची पाहणी केली. त्या पाठोपाठ मनसेचे शहराध्यक्ष रवींद्र मोरे यांनीही पाहणी केली. दरम्यान प्रसारमाध्यमांशी बोलताना, राष्ट्रवादीने मुख्यमंत्र्यांनी वेळ काढून ही मार्गिका खुली करावी असे आवाहन केले. तर मनसेने मुख्यमंत्री ही मार्गिका खुली करणार नसतील तर आम्ही करू असाच इशाराही दिला .

कळवा खाडी पुलाच्या साकेत ते कळवा नाका या मार्गिकेचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु ही मार्गिका अद्यापही खुली करण्यात आलेली नाही. ही मार्गिका खुली करण्यासाठी यापूर्वी जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन आयुक्तांची देखील भेट घेतली होती. मुख्यमंत्र्यांनी या पुलाची एक मार्गिका नवरात्रोत्सवात खुली केली जाईल असे आश्वासन दिले होते. परंतु बुधवारी दसरा असल्याने अखेर मंगळवारी दुपारच्या सुमारास राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या पुलाची पाहणी केली. या पुलाची एक मार्गिका पूर्ण झाल्याचे दाखवून दिले. त्यानंतर मनसेने त्या पुलाची पाहणी केली.

*“या पुलाचे काम पूर्ण झाले असतांनाही तो खुला का केला जात नाही, असा सवाल उपस्थित करत, ही मार्गिका खुली झाल्यास वाहतुक कोंडी सुटेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या पुलाची मार्गिका खुली करुन ठाणेकरांना दिलासा द्या. अन्यथा मनसे या पुलाचे उद्घाटन करेल.*

**– रवींद्र मोरे,** *शहराध्यक्ष, मनसे, ठाणे*

*“आम्हाला त्याचे उदघाटन करायचे नाही. मुख्यमंत्र्यांनी या पुलाचे उदघाटन करावे, त्यांनी येथे मोठा कार्यक्रम न घेता, त्यांच्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून केवळ आपली गाडी या ठिकाणाहून फिरवा आणि हा पुल खुला करावा अशी मागणी केली. ठाण्यातील पहिले मोठे उदघाटन आहे, त्यामुळे या पुलाचे क्रेडीट आम्हाला घ्यायचे नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनीच हा पुल खुला करावा, केवळ वाहतुक कोंडीतून सुटका करण्यासाठी हा पुल खुला करावा.*

**– डॉ जितेंद्र आव्हाड,** *माजी मंत्री, आमदार ,राष्ट्रवादी कॉंग्रेस*

---

# ... तर नागरीकांच्या तक्रारीचे तातडीने निराकरण करावे

## – अतिरिक्त आयुक्तांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**ठाणे** : ठाणे महापालिका परिक्षेत्रात नागरी सुविधेअंतर्गत सुरू असलेली कामे युद्धपातळीवर पुर्ण करणे, शहराचे सुशोभिकरण व संपूर्ण शहर शून्य कचरा करण्यासाठी योग्य नियोजन करणे व नागरिकांशी म्हणणे नम्रतेने ऐकून त्यांच्या समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना सर्व संबंधित उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख यांना मंगळवारी झालेल्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी व अतिरिक्त आयुक्त २ संजय हेरवाडे यांनी दिल्या.

महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या बैठकीस नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, उपायुक्त मनीष जोशी व सर्व प्रभागसमित्यांचे उपायुक्त, सहाय्यक आयुक्त आणि महापालिकेच्या विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नागरिकांना मुलभूत सेवा पुरविणे हे कर्तव्य असून अधिकाधिक नागरिकांचा महापालिकेशी सातत्याने संबंध येत असतो. नागरिकांनी सामाजिक कामासाठी संबंधित प्रभागसमितीकडे संपर्क साधल्यास वा निवेदन दिल्यास त्याचा स्थानिक पातळीवर निपटारा होणे आवश्यक आहे. छोट्या छोट्या कामांसाठी नागरिकांना मुख्यालयांशी संपर्क साधण्याची वेळ येवू नये या दृष्टीने प्रभाग समितीस्तरावर सर्व संबंधितांनी योग्य नियोजन करावे अशा सूचना आज झालेल्या बैठकीत देण्यात आल्या. तसेच नागरी विकासांतर्गत संपूर्ण महापालिका क्षेत्रात विविध प्रकल्प कामे सुरू असून या कामांचा आढावा घेवून सदरची कामे लवकरात लवकर पूर्ण होतील या दृष्टीने कार्यवाही करावी तसेच घनकचरा हा महत्वाचा विषय असून संपूर्ण महापालिका क्षेत्रात स्वच्छता अभियानातर्गत सुरू असलेले काम अधिक गतीमानतेने करावे तसेच कचरामुक्त शहरासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता करावी व संपूर्ण परिसर सुशोभित राहील या दृष्टीनेही विशेष लक्ष द्यावे असेही यावेळी नमूद करण्यात आले.

सर्व अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडण्यात व कोणत्याही नागरिकांने त्यांचे कामाबाबत तक्रार केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाईल असा इशाराही यावेळी अतिरिक्त आयुक्त २ संजय हेरवाडे यांनी दिल्या. प्रत्येक अधिकारी वर्गाने त्यांचेकडे असलेला कामांबाबतचा अहवाल तयार करावा व आगामी काळातील उपक्रमांबाबतही नियोजन करावे. तसेच सर्व प्रभागसमिती व प्रभागसमिती अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी वर्गाने आपापसात सामंजस्याने सर्व कामे पुर्ण होतील या दृष्टीने काम करावयाचे आहे. तसेच कार्यालयीन वेळेत उपस्थित राहण्याच्या सूचनाही या बैठकीदरम्यान देण्यात आल्या.

---

# ठाणे रेल्वे स्थानकाच्या पुलावर फेरीवाल्यांकडून महिलेला मारहाण

## ७५ हजारांचे मंगळसूत्र चोरी

**ठाणे** : ऐतिहासिक असलेल्या ठाणे रेल्वे स्थानकात फेरीवाल्यांच्या मुजोरीत पुन्हा: एकदा दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. रेल्वे पुलावर चालताना बाकड्याचा अडथळा होत असल्याने फेरीवाल्याला विचारणा करणाऱ्या कोपरीतील ५२ वर्षीय वर्षा पाटील यांना फेरीवाल्यांच्या टोळीने बेदम मारहाण केल्याचा प्रकार रविवारी सायंकाळी घडला. या महिलेवर चार ते पाच जणांच्या टोळीने हल्ला केला असला, तरी केवळ दोघा फेरीवाल्यांना पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केली आहे. या प्रकारात वर्षा पाटील यांचे ७५ हजारांचे मंगळसूत्र चोरीला गेले आहे. या प्रकरणी कडक कारवाईची मागणी भाजपाचे माजी नगरसेवक संजय वाघुले यांनी केली आहे.

रविवारी सायंकाळी वर्षा पाटील या दादरहून ठाण्यात परतत होत्या. त्या प्लॅटफॉर्म क्र. ५ वरून जुन्या रेल्वे पुलावर आल्यानंतर, प्लॅटफॉर्म क्र. ७ ते ८ वरील पुलावर एका फेरीवाल्याच्या बाकड्याला धक्का लागला. त्यावेळी त्यांनी फेरीवाल्याला बाकडे बाजूला करण्यास सांगितले. मात्र, त्याने अरेरावी सुरू केली. त्यावेळी वर्षा पाटील यांनी रेल्वे पोलिसांना फोन करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांना शिविगाळ सुरू करण्यात आली. काही क्षणातच तेथे बाळू भालचंद्र डोकरे हा साथीदारांसह आला. त्यानंतर त्याने व त्याच्या चार ते पाच साथीदारांनी वर्षा यांना शिविगाळ करीत बेदम मारहाण केली. दुर्दैवाने या प्रकारावेळी एकही प्रवासी मदतीला धावला नाही. कोपरीतील एका रहिवाशाने स्थानिक महिला असल्याचे सांगून फेरीवाल्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु, फेरीवाल्यांनी मारहाण सुरूच ठेवली होती. अखेर काही वेळानंतर रेल्वे पोलिस आल्यानंतर मारहाण थांबविण्यात आली. त्यानंतर बाळू डोकरे याच्या इशाऱ्यानंतर चार ते पाच फेरीवाले पळून गेले. तर पोलिसांनी बाळू डोकरे व मारहाणीत सहभागी नसलेल्या एका म्हाताऱ्या फेरीवाल्याला अटक केली.

दरम्यान, या घटनेमुळे ठाणे रेल्वे स्थानकाच्या परिसरात फेरीवाल्यांची मुजोरी कायम असल्याचे चित्र आहे. या घटनेबाबत रेल्वे पोलिसांकडून प्रसारमाध्यमांकडे कोणतीही वाच्यता केली गेली नाही. मात्र, भाजपाचे माजी नगरसेवक संजय वाघुले यांना हा प्रकार मंगळवारी दुपारी समजल्यानंतर, त्यांनी वर्षा पाटील यांची भेट घेऊन विचारपूस केली. या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी वाघुले यांनी केली आहे.

### सीसीटीव्ही फुटेज तपासणीची मागणी

**आपल्यावर झालेला हल्ला दडपण्याचा प्रयत्न रेल्वे पोलिसांकडून केला जात आहे. केवळ दोघा जणांवर गुन्हा दाखल केला. त्यातील एक फेरीवाला निर्दोष आहे. तर मारहाण करणारे आणखी चार जण फरार आहेत. बाळू डोकरे याची पार्श्वभूमी गुन्हेगारी आहे. त्याला पोलिसांकडून पाठीशी घातले जात आहे, असा आरोप करीत वर्षा पाटील यांनी करत सीसीटीव्ही फुटेज तपासून कारवाई करण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे.**

***या घटनेचा दुजोरा देत, या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करत त्या दोघांना अटक केली आहे. या मारहाण मारहाण झालेल्या महिलेचे दागिने गहाळ झाले असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.***

**– पंढरी कांदे,** *वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोहमार्ग पोलीस, ठाणे.*

---

# ठाण्याच्या गडकरी रंगायतनात ठामपाचा वर्धापनदिन संपन्न

**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेचा वर्धापन दिन हा ०१ ऑक्टोबर रोजी ध्वजारोहण व शहरातील पूजनीय नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन साजरा करण्यात आला. ठामपाच्या स्थापनेला ४० वर्षे पूर्ण झाली आहेत. नगरपालिका ते महानगरपालिका असा विकासाचा आलेख उंचावणाऱ्या ठाणे महानगरपालिकेच्या विकासाच्या यशात लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, ठाणे महानगरपालिका कर्मचारी यांचा निश्चितच मोलाचा सहभाग आहे. त्यामुळेच दरवर्षी ठाणे महापालिकेचा वर्धापनदिन हा कर्मचारी कर्मचाऱ्यांसाठीच जल्लोषात साजरा करीत असतात. गेली दोन वर्षे ठाणे महापालिकेचा वर्धापन दिन कोरोना महामारीमुळे होवू शकला नव्हता. कोरोना काळातही लोकप्रतिनिधींबरोबर प्रशासनानेही नागरिकांना उपलब्ध केलेल्या वैद्यकीय सेवासुविधांमुळे ठाण्यातील कोरोना आटोक्यात आला. त्यामुळे यंदा महापालिकेचा वर्धापनदिन हा जल्लोषात साजरा झाला.

# ठाण्यात दसऱ्याच्या मुहूर्तावर वाहन खरेदीची संख्या घटली

**ठाणे :** साडे तीन मुहूर्तावर पैकी एक मुहूर्त असलेल्या दसऱ्याला अवघ्या ८२ नव्या गाड्यांची नोंदणी नोंद झाली आहे. मात्र नवरात्रोत्सवात वाहन खरेदीत ठाणेकरांनी टॉप गिअर टाकल्याचे पाहण्यास मिळाले. या नऊ दिवसात तब्बल दोन हजार ६३८ वाहनांची नोंदणी ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या कार्यालयात झाली आहे.

अक्षय तृतीय, गुढी पडावा आणि दसरा असे साडेतीन मुहूर्त आहे. या मुहूर्तांवर खास करून वाहन खरेदी, गृह खरेदी अथवा सोने खरेदीकडे नागरिकांचा जास्तीत जास्त कल दिसून येतो. मात्र, मागील दोन वर्षापासून कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे या सर्वच क्षेत्राला आर्थिक मंदीचा मोठा फटका बसला होता. अशातच कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आल्यानंतर विविध उद्योग धंदे हळूहळू स्थिरवताना दिसत आहेत. त्यातच यंदाच्या वर्षी सण उत्सवांवरील निर्बंध राज्य शासनाने उठविले. त्यामुळे एकीकडे निर्बंध मुक्त सण उत्सव साजरे होत असताना, दुसरीकडे नवरात्रोउत्सवाच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात वाहन खरेदीत ठाणेकरांनी टॉपच गिअर टाकल्याचे पाहण्यास मिळाले आहे. नवरात्रोत्सवाच्या ९ दिवसात दोन हजार ६३८ नवीन वाहनांची नोंदणी झालेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने एक हजार ५१७ दुचाकी, ७८२ चार चाकी, २२९ मालवाहतूक करणाऱ्या वाहनाचा समावेश आहे.पण दसऱ्याच्या मुहूर्तावर अवघ्या ८२ वाहने बुधवारी दुपारी साडे तीन वाजेपर्यंत नोंदवली गेली आहेत. यामध्ये ६७ दुचाकी, १४ चारचाकी, एक मालवाहतूक वाहनाचा समावेश आहे. अशी प्रादेशिक परिवहन विभागाने दिली.

# तलावात आढळला महिलेचा मृतदेह

ठाणे: कळवा,शिवाजीनगर तलावामध्ये एका अनोळखी ४५ ते ५० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास समोर आला. या घटनेची माहिती मिळताच, कळवा पोलीस, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, तलावामधून मृतदेह बाहेर काढून कळवा पोलिसांच्या ताब्यात दिल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# जिल्हा व तालुका न्यायालये ही न्याय व्यवस्थेचा गाभा -न्यायमूर्ती अभय ओक

**ठाणे :** सामान्य माणसाला सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देणे ही न्यायालय व वकिलांची जबाबदारी आहे. जिल्हा व तालुका न्यायालये ही न्याय व्यवस्थेचा गाभा आहेत. त्यामुळे सामान्य माणसाला न्याय देण्याची महत्वाची भूमिका ही न्यायालये बजावत असतात, असे प्रतिपादन बुधवारी भिवंडीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी केले.

ठाणे जिल्हा सत्र न्यायालय, सार्वजनिक बांधकाम विभाग व भिवंडी वकील संघटनेच्या वतीने भिवंडी येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्याय दंडाधिकारीच्या नव्या इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती गौरी गोडसे होत्या. केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण प्रमुख पाहुणे होते. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार, न्यायमूर्ती शर्मिला देशमुख, ठाणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अभय मंत्री, भिवंडीचे दिवाणी न्यायाधीश शहजाद परवेझ, महाराष्ट्र बार कौन्सिलचे अध्यक्ष मिलिंद थोबडे, भिवंडी बार असोसिएशनचे अध्यक्ष मंजित राऊत, जयंत जायभावे आदी यावेळी उपस्थित होते. राज्य घटनेच्या उद्देशिकेला पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात झाली. भिवंडी न्यायालय इमारतीच्या स्मरणिकेचे व ध्वनिचित्रफितीचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. यावेळी न्यायालयीन कर्मचाऱ्याच्या हस्ते न्यायालयाच्या कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच इमारती च्या प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेल्या संविधानाच्या उद्देशिकेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना ओक म्हणाले की, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात समाजातील अनेक घटक हे आर्थिक, सामाजिक व राजकीय कारणांमुळे न्यायालयाचा दरवाजा ठोठावत नाहीत. अश्या लोकांना न्याय देण्याचे काम सर्वसामान्य लोकांचे न्यायालय म्हणून ओळखली जाणारी जिल्हा व तालुका न्यायालये करतात. त्यामुळे त्यांना दुय्यम न्यायालय म्हणू नये. सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी गेल्या ७५ वर्षात आपण काय मिळवायला हवं हे जाणून ते मिळविण्यासाठी कुठं कमी पडलो याचा विचार करायला हवा.

राज्यात गेल्या दहा वर्षात न्यायालयाच्या अनेक चांगल्या इमारती उभारल्या आहेत. परंतु अद्यापही न्याय व्यवस्थेसाठी चांगल्या सुविधा देण्यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवेत. न्याय व्यवस्थेसाठी चांगल्या सुविधा दिल्यास जलद न्याय मिळेल. त्याच प्रमाणे माहिती तंत्रज्ञानाचा न्याय व्यवस्थेमधील वापर वाढविण्यासाठी गांभीर्याने विचार व्हावा. त्यासाठी ठाणे जिल्ह्याने पुढाकार घ्यावा, असेही ओक म्हणाले.तर, न्यायमूर्ती श्रीमती गोडसे म्हणाल्या की, भिवंडी न्यायालयाची सुंदर इमारत उभी राहिली आहे. आता या इमारतीमधून नागरिकांना न्याय मिळवून देण्याचे काम न्यायालयाने व वकिलांनी करावे. भिवंडी न्यायालयातील गेल्या पाच ते दहा वर्षातील खटले लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी न्यायालयाने व वकिलांनी प्रयत्न करावेत. त्यातून नागरिकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल.

# बनावट विवाह प्रमाणपत्राद्वारे करोडो रुपयांची मालमत्ता हडपणाऱ्या महिलेसह तिघांना अटक; खंडणी विरोधी पथकाची कामगिरी

**ठाणे:** बनावट विवाह प्रमाणपत्र तयार करून त्याव्दारे १९.७० कोटी मालमत्ता हडपणाऱ्या महिलेचा डाव ठाणे शहर पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने उधळून लावला आहे. याप्रकरणी नौपाड्यातील अंजली घनश्याम अग्रवाल (३०) हिच्यासह माजीवडा येथील थॉमसर रामुल गोडपवार (५०) आणि बाळकुम येथील महेश गणेश काटकर (३७) या त्रिकुटाच्या हातात बेड्या घालण्यात यश आले असून त्यांना न्यायालयाने येत्या ७ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती ठाणे शहर पोलिसांनी दिली.

अटक केलेल्या अंजली हिचे मयत अनिल पापडे यांच्या प्रेमसंबंध होते. अनिल याचे २३ नोव्हेंबर २०२१ निधन झाले. त्यानंतर अंजली हिने अटकेतील दोन साथीदारांच्या मदतीने बनविलेले बनावट विवाह प्रमाणपत्राचा आधाराद्वारे वारस हक्क सांगून ठाणे येथील तीन फ्लॅट, मयताचे नावे असलेली कावेसर येथील मोकळी जागा, सोन्या चांदीचे दागिने अशी एकूण १९.७० कोटीची

स्थावर व जंगम मालमत्ता अपहार केला. याप्रकरणी मयत अनिल यांची आई सुरेखा सुरेश पापडे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेत, नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार १६ मे २०२२ गुन्हा दाखल झाला. त्या तक्रारीची चौकशीमध्ये त्यांचा मयत मुलगा अनिल पापडे याच्याशी लग्न झाल्याचे बनावट प्रमाणपत्र अंजली अग्रवाल हिने कविता पटेल, साहील जी व लक्ष्मी एम, यांचे मदतीने तयार करून मयताची १९.७० कोटीची स्थावर व जंगम मालमत्ता हडप केल्याचे निष्पन्न झाले. ३ ऑक्टोबर रोजी तिला अटक करण्यात आली. अटके दरम्यान तीने सदरचे प्रमाणपत्र हे थॉमसर गोडपवार, महेश काटकर यांचे मदतीने तयार केल्याचे सांगितले. त्या आधारे त्यांनाही या गुन्हयात अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्या तिघांना न्यायालयाने येत्या ७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त,लक्ष्मीकांत पाटील, सहायक पोलीस आयुक्त, शोध -२, अशोक राजपुत, तसेच खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांचे मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक सुधाकर हुंबे, सहायक पोलीस निरीक्षक पोपट नाळे, पोलीस उपनिरीक्षक विजय राठोड, महेश कवळे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुभाष तावडे, सत्यवान सोनवणे, पोलीस हवालदार संजय बाबर, जगन्नाथ सोनवणे, राठोड, योगीराज कानडे, कल्याण ढोकणे, संदिप भोसले, सुहास म्हात्रे, पोलीस नाईक भगवान हिवरे, शितल पावसकर, पोलीस शिपाई शेजवळ, देवेंद्र देवरे, तानाजी पाटील, मयुरी भोसले यांनी केली आहे.



# ठाण्यात १८ मजल्यावर आग; आगीवर तासाभरात नियंत्रण

**ठाणे:** घोडबंदर रोडवरील हिरानंदानी-१ पार्कमधील प्रिस्टन या इमारतीच्या १८ व्या मजल्यावरील प्रशांत कामत यांच्या ( श्री बीएचके) मालकीच्या घरात आग लागल्याची घटना बुधवारी दुपारी १ वाजून ४० मिनिटांच्या सुमारास घडली. या आगीचा धूर त्या मजल्यावर पसरला होता. तसेच त्या मजल्यावरील १० रहिवाशांची अग्निशमन दलाचे जवान व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने सुखरूप सुटका करण्यात आली. तसेच सुमारे ०१-तासाच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर ती आग पूर्णपणे नियंत्रणात आली. आग लागली,त्यावेळी घरात कोणी नसल्याने घराचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून ही आग शॉर्टसर्किट झाल्याने लागली असावी असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे.



# लोवले येथील दुर्गा देवीच्या मूर्तीचे वाजत-गाजत केले विसर्जन

**संगमेश्वर :** तालुक्यातील लोवले (दोरकडेवाडी) येथील श्री सिताराम झिलू दोरखडे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या दुर्गा देवीच्या मूर्तीचे आज विसर्जन करण्यात आले. यावेळी दोरकडेवाडीचे ग्रामस्थ एकत्र येऊन भगिनी मुले व अबाल वृद्ध यांच्या समवेत वाजत गाजत व नाचत जल्लोषात विसर्जन पार पडले. गेल्या नऊ दिवसात नवरात्र उत्सवात भजन, टिपऱ्या, गरबा, महाप्रसाद ,आरती असे विविध कार्यक्रम २२ व्या वर्षात विना तक्रार संपन्न झाले. अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून देवीचा आशीर्वाद प्राप्त केला.

# भाजपा प्रदेश सचिव प्रमोद जठार यांची मुलींच्या वसतिगृहाला सदिच्छा भेट

**संगमेश्वर :** तालुक्यातील कोळंबे परिसर विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने स्वयंम् अर्थसहाय्यीत मुलींचे वसतिगृह कोळंबे येथे ग्रामीण भागामध्ये सुरु केले आहे. या वसतिगृहाध्ये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये रायगड जिल्हयातील आदिवासी भागातील शिक्षणापासून वंचित असलेल्या ७ विदयार्थिनींनी तर रत्नागिरी जिल्हयातील ११ मुलींनी प्रवेश घेतला आहे. या मुलींच्या वसतिगृहाला भाजप प्रदेश सचिव प्रमोद जठार यांनी कार्यकर्त्यांसह भेट दिली. दरम्यान वसतिगृहाची पहाणी करुन सर्व अडचणी समजून घेतल्या व रोख रक्कम एक लाख रुपयांची देणगी दिली. तसेच श्रीमती क.पा. मुळ्ये हायस्कूलला १० संगणक संच देण्याचे त्यांनी कबूल केले आहे. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अनिल घोसाळकर, बापू सुर्वे, कोळंबे संस्थेचे अध्यक्ष नयन मुळ्ये, सचिव दिलीप मुळ्ये, मुख्याध्यापक संजय मुळ्ये सर्व शिक्षक व ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

# जीएसटी भरण्यासाठी दिलेले ९ लाख रुपये परस्पर लांबवले

**चिपळूण / विशेष प्रतिनिधी –** जीएसटी भरण्यासाठी दिल्लीतील नातेवाईकाच्या अकाउंटवर ९ लाख ८९४ रुपये पाठवले परस्पर हडप केल्याप्रकरणी चिपळूणात वृध्दावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फारुख अन्सारी (७२, दिल्ली) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या वृध्दाचे नाव आहे. याबाबतची फिर्याद जियाउलहक जमील मुल्ला (३८, एकता अपार्टमेंट, वाणीआळी चिपळूण) यांनी पोलीस स्थानकात दाखल केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जियाउलहक जमील मुल्ला यांचे मित्र अब्दुल कादीर पांगारकर (रा. अंजनवेल, गुहागर) यांनी फारुख अन्सारी यांच्या आयसीआयसीआय बँक न्यू दिल्ली येथील अकाउंटवर २०२१ ते २०२२ या कालावधीत जीएसटी भरण्यासाठी एकूण ९ लाख ८९४ रुपये पाठवले होते. परंतु अन्सारी याने जीएसटी न भरता जीएसटीमध्ये भरणा केल्याची खोटी पावती व्हॉट्सॲप नंबरवर पाठवून दिली. मात्र अद्यापपर्यंत जीएसटी भरला गेला नसल्याचे लक्षात येताच जीएसटी साठीचे पैसे परस्पर लाटण्यात आले आहेत अशी पांगारकर यांनी मुल्ला खात्री झाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी चिपळूण पोलीस स्थानकात फारुख अन्सारी याच्याविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अन्सारी याच्यावर भादविकलम ४०६, ४१९, ४२०, ४७१ नुसार गुन्हा दाखल केला आहे. याबाबतचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक कनोजा करत आहेत.

# खेडमध्ये उभ्या डंपरचे पार्ट कटरने कापून ३ लाखांची चोरी, ५ जणांवर गुन्हा दाखल

**खेड /प्रतिनिधी –** खेड भरणेनाका येथे मोकळ्या जागेत उभ्या करुन ठेवलेल्या डंपरच्या पार्टची ३ लाखांची चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. ५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद राकेश एकनाथ कोळी (भरणेनाका, खेड, मूळ सांगली) यांनी खेड पोलीस स्थानकात दिली. ही घटना ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राकेश कोळी यांच्या मालकीचा डंपर भरणेनाका येथे पार्क करुन ठेवण्यात आला होता. या डंपरचे काही लोक गॅस कटरच्या सहाय्याने भाग कट करुन चोरी करत असल्याचे तेथील लोकांनी पाहिले. याबाबतची माहिती कोळी यांच्या भावाला दिली. लागलीच राकेश कोळी, जितेश कोळी आणि त्यांचा मित्र श्रीकांत जाधव असे तिघे ट्रक उभा असलेल्या ठिकाणी पोहोचले. त्यांनी याविषयी विचारणा केली असता त्यातील एका अनोळखी व्यक्ती कोळी यांनाच धमकावू लागला. यानंतर राकेश यांनी पोलीस स्थानकात तक्रार दिली.

याबाबत राकेश कोळी यांनी पोलिस स्थानकात दिलेल्या तक्रारीत एकूण २ लाख ९० हजार रुपयांच्या साहित्याची चोरी केल्याचे म्हटले आहे. पोलिसांनी जनार्दन पवार (३०, भरणे), सचिन तटकरे (३०, खोंडे), सुनील महाडिक (५५, शिवतर), अनिल जाधव (३१, तिसे), जयेश जाबरे (३२, जाबरेवाडी, सर्व राहणारे खेड) या ५ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

# देवरूखात १५ ऑक्टोबरपासून जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा

**संगमेश्वर :** तालुक्यातील देवरूख येथील ग्रामदेवता श्री सोळजाई देवी मंदिरात दि. १५, १६ ऑक्टोबरला जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेत ब्रेक टू फिनिश, ब्लॅक टू फिनिश नोंदविणाऱ्या खेळाडूंना पहिल्या फेरीपासून खास पारितोषिके देण्यात येणार आहेत. रत्नागिरी जिल्हा कॅरम असोसिएशन, ग्रामदेवता श्री सोळजाई मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेली स्पर्धा पुरूष एकेरी, पुरूष दुहेरी, ५० वर्षांवरील वयस्कर पुरूष गट, महिला एकेरी, १८ वर्षाखालील कुमार गट, कुमारी गट, १४ वर्षांखालील किशोर गट, किशोरी गट अशा गटांमध्ये खेळविली जाणार आहे.

# लम्पी आजाराच्या पार्श्वभूमीवर जनावरांचे लसीकरण पूर्ण

**संगमेश्वर /प्रतिनिधी –** लंपी स्किन आजाराच्या पार्श्वभूमीवर संगमेश्वर परिसरातील ९९ टक्के जनावरांच्या लसीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. जनावरांच्या मालकांनी आता आवश्यक ती काळजी घेऊन रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सहायक पशुसंवर्धन अधिकारी डॉ. मनोहर ढाकणे यांनी केले. या पार्श्वभूमीवर छावा मराठा योद्धा संघटनेचे जिल्हाध्यक्ष वहाब दळवी यांनी आढावा घेतला. गाय, बैल, म्हैस या जनावरांना आजारापासून वाचविण्यासाठी डॉ. ढाकणे यांनी लसीकरणाची मोहीम सुरू केली आहे. रोगाचा प्रादुर्भाव झालेले एकही जनावर अद्यापपर्यंत आढळलेले नाही. कसबा, भिरकोंड, साखळकोंड, असुर्डे आदी भागातील ३०० जनावरांच्या लसीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.तहसीलदार सुहास थोरात, गटविकास अधिकारी बी. बी. चौगुले यांनी सरपंचांना आजारासंदर्भात जनजागृतीचे आदेश दिले.



# डॉ. बाबासाहेबांचे विचार हे उत्क्रांतीच्या पुढचे विचार – संतोष गमरे

**संगमेश्वर :** तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभा ग्रामशाखा ताम्हाने तथा ताम्हाने बौद्धजन कमिटी व माता रमाई महिला मंडळ (स्थानिक व मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने अशोका विजया दशमी ६६ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून रत्नागिरी जिल्हा परिषदेचे प्रकल्प अधिकारी (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) संतोष गमरे यांच्या उपस्थितीत तसेच गावचे सरपंच अमर सावंत, महिला अध्यक्षा मनीषा जाधव, ताम्हाणे स्थानिक कमिटीचे अध्यक्ष संतोष जाधव यांच्या हस्ते धम्मध्वज फडकवून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी तथागत गौतम बुध्द व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मार्गदर्शन करताना संतोष गमरे यांनी सुरुवातीलाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचे वाचन केले. त्यानंतर तथागत बुध्दांनी दिलेल्या चार आर्यसत्यचे स्पष्टीकरण देत बुद्धाने चार आर्यसत्याच्या अनुषंगाने आध्यात्मिक, आधिभौतिक,आधिदैविक अशी दुःखाची तीन कारणे, अष्टांगिक मार्ग यांची विस्तृतपणे मांडनी करून बुद्धाच्या सुख-दुःखात सकारात्मकता आहे. तसेच आपल्याला २२ प्रतिज्ञाचा मापदंड मिळाला की माणसाची प्रगती निच्छित होईल, असे ठणकावून गमरे यांनी उपस्थितांना सांगितले.

# स्वच्छ भारत अभियानात राजापूर शहराचा राज्यातील १०५ शहरांमधून पाचवा क्रमांक

**राजापूर/प्रतिनिधी –** केंद्र शासनामार्त स्वच्छ भारत अभियानांतर्गत देशातील शहरांच्या स्वच्छतेबाबत नुकतेच सर्व्हेक्षण करण्यात आले होते. सन २०२२ च्या सर्व्हेक्षणात राजापूर नगर परिषदेने महाराष्ट्रातील १०५ शहरांमधून पाचवा क्रमांक पटकावला आहे. तर देशातील पश्चिम विभागामध्ये २७९ शहरांमधून सहावा क्रमांक संपादन केला आहे. यांच्या जोडीला राजापूर शहराला ओडीएफ प्लस प्लसचे मानांकन व वनस्टार रेटींग देखील प्राप्त झाले आहे. दरम्यान, मुख्याधिकारी प्रशांत भोसले व आरोग्य पर्यवेक्षिका सौ. श्रेया शिर्वटकर तसेच कर्मचारी, विशेषतः आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमातून राजापूर शहराने लक्षवेधी यश मिळविल्याचे मुख्य लिपिक जितेंद्र जाधव यांनी सांगीतले. या यशासाठी मेहनत घेणाऱ्या सर्वांचे तसेच अभियानाला प्रतिसाद देणाऱ्या नाग रिकांचे मुख्याधिकारी भोसले यांनी अभिनंदन करून धन्यवाद दिले आहेत.



# ठाण्यात आगीच्या घटनेत वाढ

**ठाणे:** ठाणे शहरातील वेगवेगळ्या भागात ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीच्या पहिल्या पाच दिवसात तब्बल ११ आगीच्या घटनांची नोंद झाली आहे. सुदैवाने या घटनां मध्ये कोणालाही दुखापत झाली नसली, तरी वित्तहानी झालेली आहे. या घटनांमध्ये वाहने, एसी, स्विच बोर्ड तसेच मीटर बॉक्समध्ये शॉर्टसर्किट होऊन जळाले असल्याने ही ऑक्टोबर 'हिट' ची सुरुवात असल्याचे बोलले जात आहे. मात्र एका घटनेत अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दहा जणांची आगीमुळे पसरलेल्या धुरातून सुखरूप सुटका ही केली आहे.

१ ऑक्टोबर रोजी मुंब्रात एका चारचाकी वाहनाच्या वायरिंगला लाग लागली होती. या घटनेनंतर , दिवा शीळफाटा रोड येथे दुचाकीने अचानक पेट घेतले होते. त्यातच, त्या दिवशी धर्मवीर नगर येथील बिल्डिंग नंबर १० मधील तळ मजल्यावरील रूम नंबर ७ च्या हॉलमध्ये आग लागली. या आगीत त्या घरातील पलंग,कपाटाची अक्षरशः खाकरांगोळी झाली. दुसऱ्या दिवशी म्हणजे २ ऑक्टोबरला पुन्हा मुंब्रा-कौसा रोडवरती दुचाकीला आग लागली तर ३ ऑक्टोबरला पांचपाखाडी येथे स्नॅक्स शॉपमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागली. हे होत नाही तोच घोडबंदर रोड, आनंद नगर येथे उन्नती वूड्स कॉम्प्लेक्स डी ४ मधील गाळा क्रमांक ७ मध्ये शॉर्ट सर्किट होऊन आग लागली. तसेच दिवा, खर्डीगाव येथे एका घराच्या छतावरील तात्पुरत्या स्वरूपात बांधण्यात आलेल्या पत्र्याच्या शेडखाली ठेवलेल्या लाकडाला आग लागली. तर लुईसवाडी येथे ऍक्युलेट सोसायटी इमारत क्रमांक ५ मधील तळ मजल्यावरती असलेल्या मीटर बॉक्स रूम मध्ये आग लागली. ४ ऑक्टोबर रोजी पातलीपाडा हिरानंदानी इस्टेट, येथील १६ व्या मजल्यावरील नरेश अलानी यांच्या दोन घरातील एसी इनडोअर युनिटला तसेच सिलिंगला आग लागलीद्र

# स्मार्ट सिटी प्रकल्पातील कामे ठरलेलेल्या वेळेत पूर्ण करा – महापालिका आयुक्त अभिजीत बांगर



**ठाणे :**स्मार्ट सिटी अंतर्गत ठाणे शहरात सुरू असलेले १५ प्रकल्प हे नियोजित वेळेत पूर्ण व्हायलाच हवेत. तसेच, त्यातील सीसीटीव्ही प्रकल्पाची अमलबजावणी करताना त्याचा पोलिसांना सर्वाधिक उपयोग होईल, याची दक्षता घ्या, असे आदेश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी गुरूवारी दिले. स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या सुमारे १०५० कोटी रुपयांच्या कामाचा आढावा आयुक्तांनी घेतला.

अतिरिक्त आयुक्त (१) आणि स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवी यांनी सर्व प्रकल्पांची माहिती व सद्यस्थिती सांगणारे सादरीकरण केले. एकूण ३९ प्रकल्पापैकी २४ पूर्ण झाले असून १५ प्रकल्पांची कामे सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. अतिक्रमणे, वनखात्याचे आक्षेप, जनहित याचिका आदींमुळे प्रकल्पांच्या कार्यकाळात होत असलेल्या विलंबाबद्दलही माळवी यांनी आयुक्त बांगर यांना अवगत केले.

ठाणे पूर्व येथील सॅटीस प्रकल्पांची वाटचाल आणि गावदेवी मैदानाखालील भूमिगत पार्किंग कामांबाबत आयुक्त बांगर समाधान व्यक्त केले. मुलुंड आणि ठाणे दरम्यानच्या नवीन स्टेशनाचा विषयाबाबत स्वतंत्र बैठक आयोजित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

पोलिसांच्या नियंत्रण कक्षाशी जोडलेले ४०० कॅमेरे आणि पालिकेच्या हाजुरी येथील सेंटरशी जोडलेले १७०० कॅमेरे यांचे एकत्रिकरण करावे. या दोन्ही यंत्रणांचा सर्वाधिक उपयोग पोलिसांना आहे. हे लक्षात घेऊन ही यंत्रणा प्राधान्याने जोडून घ्यावी. कामे करताना कोणत्याही समस्या आल्या असतील तर त्यावर मार्ग काढून हा प्रकल्प उपयोगी कसा होईल हे पहावे, अशी सूचना आयुक्तांनी संबंधितांना केली.

# मुंब्र्यात बंद रूमला आग



**ठाणे:** मुंब्रा,दत्तवाडी, येथे म्हात्रे मेंशन या ४ मजली सोसायटीच्या तळ मजल्यावरती असलेल्या एका बंद रूममध्ये आग लागल्याची घटना शुक्रवारी पहाटे ४ वाजून २० मिनिटांच्या सुमारास घडली. या आगीत रूम मधील पुठ्ठा, गादी, नारळाच्या गोण्या आदी वस्तूंचा साठा करून ठेवण्यात आला होता,त्याला आग लागली होती. ती आग नियंत्रणात आणण्यात यश आले आहे. मुंब्र्यात बंद रूम मध्ये आग लागल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी मुंब्रा पोलीस, टोरंट विद्युत कर्मचारी, मुंब्रा अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली होती. तातडीने लागलेल्या आगीवर अग्निशमन दलाच्या जवानांनी पूर्णपणे नियंत्रण मिळविले. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नसून यावेळी १- फायर वाहन, १- रेस्क्यू वाहन, १- वॉटर टँकर वाहन पाचारण केले होते अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# ठाणे रेल्वे स्थानक फेरीवाला मुक्त करण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक करा

**खासदार राजन विचारे यांची रेल्वे महाव्यवस्थांकडे मागणी**

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकात प्रवासी महिलेला फेरीवाल्यांकडून मारहाण झाली. याचदरम्यान त्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाळ झाले. याप्रकरणी दोषींवर तातडीने कारवाई करावे अशी मागणी ठाण्याचे खासदार राजन विचारे यांनी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अनिल कुमार लाहोटी, आरपीएफ चे पोलीस आयुक्त ऋषी शुक्ला तसेच लोहमार्ग पोलीस आयुक्त केसर खलीद यांच्याकडे निवेदन पत्राद्वारे केली आहे. कारवाई न केल्यास जनआंदोलन केले जाईल, असा इशारा ही त्यांनी त्या पत्रामधून रेल्वे प्रशासनाला दिला आहे. तसेच ठाणे रेल्वे स्थानक फेरीवाला मुक्त करण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक करा अशीही केली आहे.

कोपरीतील ५२ वर्षीय महिला रविवारी दादर वरून आणि ठाणे रेल्वे स्थानकात परतत असताना फलाट क्रमांक पाच वरून जुन्या रेल्वे पुलावर आल्यानंतर फलाट क्रमांक ७, ८ वरील पुलावर एका फेरीवाल्याच्या बाकड्याला धक्का लागला. महिलेने त्या फेरीवाल्याला बाकडे बाजूला करण्यास सांगितले. त्यावेळी त्या फेरीवाल्यांनी त्या महिल्याची हुज्जत घालून शिवीगाळी करण्यास सुरुवात केली. त्या महिलेने रेल्वे पोलिसांकडे तक्रार केली. परंतु फेरीवाल्याला पाठीशी घालण्याचा रेल्वे पोलिसांकडून प्रयत्न केला जात होता. संबंधित बाळू डुकरे या गुन्हेगार प्रवृत्तीच्या फेरीवाल्यावर कडक कारवाईची मागणी खासदार विचारे यांनी केली आहे.

# कोपरीत उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गटांचे समर्थक आमने-सामने



**ठाणे :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोपरी पांचपाखाडी या विधानसभा मतदारसंघातील कोपरीत उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन्ही गटांचे समर्थक शुक्रवारी आमनेसामने आले होते. कोपरी पूर्व येथील कुंभारवाडा परिसरातील शिवसेना शाखा ताब्यात घेण्यावरून हे दोन गट भिडल्याचे पाहण्यास मिळाले. त्यामुळे या परिसरात काळ तणावाचे वातावरण पसरल्याने पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता. तसेच पोलिसांनी त्या दोन्ही गटांना शाखेची चावी देऊन वादावर पडदा टाकण्याचे काम केले. तसेच दसरा मेळाव्याचा ठाकरे गटाचा बॅनर शिंदे गटाने शाखेवरून हटवला.

मुख्यमंत्री शिंदे ज्या मतदार संघातून निवडून आलेले त्या मतदार संघात कोपरी तील कुंभारवाडा येतो. तसेच शिवसेनेची शाखा असून ती शाखा शिंदे गटाकडून नुतनीकरण करण्यात येणार आहे. परंतु ही शाखा तोडणार आहेत, अशी अफवा पसरली. त्यानंतर शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे, उपनेत्या अनिता बिर्जे हे कृष्णकुमार कोळी या ठाकरे समर्थकांनी शाखेकडे धाव घेतली. त्याचवेळेस शाखेत शिंदे गटाचे प्रकाश कोटवानी, रोहित गायकवाड , माजी नगरसेवक मालती पाटील आणि शर्मिला पिंपोळकर या आदी उपस्थित होत्या. याचदरम्यान दोन्ही गटाचे कार्यकर्ते जमण्यास सुरुवात झाल्यावर शाखा ताब्यात घेण्यावरून दोन्ही गट आमने सामने आले. त्यामुळे त्या परिसरात काही काळ तणावाचे वातावरण पसरले. पोलिसांनी वेळीच धाव घेत, चोख बंदोबस्त तैनात केला. तसेच याची माहिती मिळताच शिंदे गटाचे ठाणे जिल्हा प्रमुख नरेश म्हस्के, माजी नगरसेवक राम रेपाळे यांच्यासह कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले ते शाखेत जाऊन बसले. दरम्यान पोलिसांनी वाद वाढू नये यासाठी, दोन्ही गटांना शाखेची चावी देऊन वाद मिटविला. पाहिले ठाकरे गटाचे त्यानंतर, शिंदे गटाचे पदाधिकारी तेथून निघून गेले. काही दिवसांपूर्वी ठाण्यातील मनोरमानगर भागात वाचनालय ताब्यात घेण्यावरून ठाकरे आणि शिंदे हे दोन्ही गटात वाद झाले होता.

### *ठाकरे गटाचा दसऱ्याचा बॅनर हटवला*

*शाखेवर दसरा मेळावा निमित्त लावलेला उद्धव ठाकरे यांचा बॅनर शाखेतून निघताना शिंदे गटाचे पदाधिकारी हटवला. तो बॅनर एका बाजूला नेल्याचे पाहण्यास मिळाले.*

*या शाखेचे आम्ही नूतनीकरण करत आहोत. तर काही जणांनी ही शाखा तोडण्यात येणार आहे अशी माहिती दिल्याने हा प्रकार घडला. तर या शाखेमध्ये भगव्याची एक निष्ठ असणाऱ्यांनीच शाखेत येऊ बसावे.* **– नरेश म्हस्के,** *जिल्हा प्रमुख, ठाणे*

# ठाणे शहरातील पुलांच्या प्रलंबित कामांचा महापालिका आयुक्तांनी घेतला आढावा

**ठाणे : ठाणे शहरातील उड्डाण पूलांच्या प्रलंबित कामांचा महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी शुक्रवारी आढावा घेतला. त्यात, कामांच्या दर्जा बाबत कोणतीही तडजोड नको, तसेच, ज्युनिअर आणि डेप्युटी इंजिनिअर यांनी दररोज साईटवर भेटी द्याव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. त्याचप्रमाणे, कामे पूर्ण झाल्यावर दोष दायित्व कालावधीमध्ये कोणतीही मोठी दुरुस्ती निघणार नाही, अशा पद्धतीने कामे करावीत, असेही स्पष्ट केले.**

## *कामांच्या दर्जा बाबत तडजोड नको, ज्युनिअर आणि डेप्युटी इंजिनिअर यांनी दररोज साईटवर भेटी द्याव्यात*
## *– आयुक्तांच्या सूचना*



ठाणे शहर आणि परिसरातील काम सुरू असलेले तसेच प्रस्तावित उड्डाणपुल, पादचारी पूल यांचा सविस्तर आढावा आयुक्तांनी घेतला. शहर अभियंता प्रकाश सोनाग्रा यांनी त्याबद्दलचे सादरीकरण केले.

कळवा पुलाच्या एका मार्गिकेची शिल्लक कामे तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचनाही यावेळी आयुक्त बांगर यांनी दिल्या. के व्हीला पुलाचे काम ४० टक्के झाल्याची माहिती बांधकाम विभागाने दिली. या प्रकल्पात २३३ प्रकल्पग्रस्तांचे पूर्नवसन शिल्लक आहे. ते जलद केले जावे. तसेच, दिवा रेल्वे उड्डाणपूलाच्या पश्चिमेकडील कामासाठी भूसंपादन प्रक्रिया वेगाने करण्यास आयुक्त बांगर यांनी संबंधितांना दिल्या. प्रलंबित भूसंपादनाचे प्राधान्यक्रम ठरवून दिवसनिहाय पाठपुरावा केला जावा, तसेच, भूसंपादन कामामुळे प्रकल्प अमलबजावणीत विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही आयुक्तांनी सांगितले.

एका बाजूला दर्जाबाबत पुरेशी दक्षता घेत असतानाच, शहर सौदर्यीकरणात कशी भर पडेल, याचा विचार करण्यात यावा. पूलांचे खांब, विजेचे खांब यांची निवड, वैशिष्ट्यपूर्ण रचना यावरही लक्ष द्यावे, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. ऐरोली – काटई नाका रस्ता, देसाई खाडीवरील पूल, आगासन गावातील पोहोच रस्ता यांच्या परवानगी, न्यायालयातील सुनावणी आदी बाबी तत्काळ मार्गी लागतील, अशा तऱ्हेने नियोजन करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. सिंघानिया शाळा पादचारी पुल, घोडबंदर रोड पादचारी पुल, विटावा पादचारी पूल, बाळकुम नाका पादचारी पुल, खारेगाव क्रॉसिंग आदी प्रकल्पांची सद्यस्थिती बद्दल आयुक्तांनी जाणून घेतली आणि पादचारी पूलांबाबत दक्षतेने कामे करण्याच्या सूचना केल्या.

### प्रकल्प विनाविलंब पूर्ण करण्यावर भर

*शहर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी हाती घेतलेले प्रकल्प विनाविलंब पूर्ण करण्यासाठी शहर अभियंता विभागासोबत बैठक घेतली. कंत्राटदारांना कोणतीही सवलत न देता प्रकल्प पूर्ण करण्यावर लक्ष द्यावे.*

*– अभिजीत बांगर, आयुक्त महापालिका ठाणे*

# बेकायदा फेरीवाल्यांविरोधात भाजयुमोची स्वाक्षरी मोहीम

## फेरीवाल्यावर गुन्हे दाखल करण्याची आरपीएफकडे मागणी

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानकातील रेल्वेपुलावर प्रवाशी महिलेला झालेल्या मारहाणीनंतर, बेकायदा फेरीवाल्यांविरोधात भाजयुमोने आक्रमक भूमिका घेऊन फेरीवाल्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी रेल्वे सुरक्षा बलाकडे (आरपीएफ) केली आहे. त्याचबरोबर रेल्वे स्थानकाच्या परिसरात महिलांची सुरक्षितता धोक्यात आल्याचा आरोप करून स्वाक्षरी मोहीम हाती घेतली.

रेल्वे पुलावर महिलेला झालेल्या मारहाणीनंतर प्रवाशी व विविध संघटनांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या संदर्भात प्रसारमाध्यमांकडून आवाज उठविल्यानंतर, ठाणे रेल्वे स्थानकाच्या परिसरातून फेरीवाले गायब झाले होते. मात्र, फेरीवाल्यांवर कायमस्वरूपी कारवाई करावी. फेरीवाल्यांमुळे महिला प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात आली असल्याकडे लक्ष वेधून भाजयुमोच्या कोकण सहसंयोजिका वृषाली वाघुले यांनी रेल्वे स्थानकाबाहेर शुक्रवारी सायंकाळी स्वाक्षरी मोहीम घेतली. तसेच ऋआरपीएफ'चे प्रभारी निरीक्षक प्रताप भानसिंह यांना निवेदन देऊन फेरीवाल्यांवर कठोर कारवाई करून गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. भाजपाचे माजी नगरसेवक संजय



वाघुले व वृषाली वाघुले यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात प्रशांत कळंबटे, मुकेश काळे, संजय लाड, शरीफ शेख, हनीफ खान, अनिकेत मुळे, दिलीप मिश्रा, शुभम गुप्ता, प्रवेश तिवारी, विशाखा कनकोसे, कमल सावळे, राणी क्षीरसागर, वंदना शिंदे, सुनिता वाघुले, भक्ती मोहिते आदींचा समावेश होता.

ठाणे रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्या महिलांमध्ये असुरक्षिततता आहे. यापूर्वीही फेरीवाल्यांच्या अरेरावीचा अनेक महिला व पुरुष प्रवाशांना फटका बसला आहे. मात्र, फेरीवाल्यांच्या दहशतीमुळे प्रवाशांनी तक्रारी दाखल केलेल्या नाहीत, ही वस्तूस्थिती आहे. फेरीवालामुक्त ठाणे रेल्वे स्टेशन होण्यासाठी रोज महिलांवर हल्ला होण्याची रेल्वे पोलिस बल वाट पाहत आहे का, प्रवाशांचा खून होण्याची प्रशासन वाट पाहत आहे का, असा सवाल निवेदनाद्वारे विचारण्यात आला आहे.

### विनापरवानगी घुसखोरीचा गुन्हा दाखल करावा

रेल्वे स्थानकाच्या १५० मीटर परिसरातून फेरीवाले हटवावेत. यापुढे रेल्वे स्थानकाच्या हद्दीत आढळलेल्या बेकायदा फेरीवाल्यांवर रेल्वेच्या मालमत्तेत विनापरवानगी घुसखोरी केल्याचा गुन्हा दाखल करावा. या प्रसंगी सातत्याने सीसीटीव्हींची तपासणी करून फेरीवाल्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी भाजपाच्या कोकण सहसंयोजिका वृषाली वाघुले यांनी केली आहे.

# कामाची वेळ न पाळणाऱ्या ठामपा कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

ठाणे: कामाच्या ठिकाणी वेळेत यावे हा साधा नियम आहे. मात्र ठाणे महापालिकेत त्या नियमांची अक्षरशः पायमल्ली होत असल्याने आता तीन दिवस उशीर येणाऱ्या कर्मचाऱ्यांची एक दिवसाची सीएल लावण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. याचा मुहूर्त ही दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारीच काढला. त्यामुळे या पहिल्याच दिवशी ३० टक्के कर्मचारी उशिरा आल्याचे दिसून आले आहे. तर यापूर्वी मोबाईलच्या आहारी गेलेल्या अशा कर्मचाऱ्यांच्या विरोधात महापालिकेने कडक पावले उचलत, प्रत्येक मजल्यावर सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत. त्यानंतर कर्मचाऱ्यांना शिस्त लागल्याचे दिसत आहे.

ठाणे महापालिकेत कायमस्वरूपी एकूण ८ हजार २७८ इतकी कर्मचारी संख्या असून ती विविध विभाग विभागलेली आहे. परंतु महापालिकेची प्रभाग समिती असेल, आरोग्य विभाग असेल किंवा महापालिका मुख्यालय असेल अशा प्रत्येक ठिकाणी कर्मचारी– अधिकारी हे उशीरानेच येतांना दिसत आहेत. ही बाब महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या निर्दशनास आल्यावर त्यांनी या संदर्भात आस्थापना विभागाला निर्देश दिले. त्यानुसार आता महापालिकेच्या आस्थापना विभागाकडून या संदर्भात पावले उचलण्यात आली आहेत. कामावर उशिराने येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विरोधात महापालिकेने हजेरी बुक गायब करुन उशिराने येणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तर यापुढेही सलग तीन दिवस उशिराने येणाऱ्या या कर्मचाऱ्यांची एक दिवसाची सीएल लावली जाणार असल्याचेही पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# ठामपा आयुक्तांची आपत्ती व्यवस्थापन कक्षाला भेट



**ठाणे:** ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी शुक्रवारी अचानक ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षाला भेट दिली.यावेळी, आयुक्तांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षातील कामकाजाची व तक्रारींचा आढावा घेतला. याशिवाय प्रलंबित तक्रारी तसेच मनुष्यबळ,साधन सामग्री यांचा आढावा घेतला. आयुक्तांसोबत अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे , उप-आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन) जी.जी.गोदेपुरे, उप-आयुक्त परिमंडळ-१ मनीष जोशी, कोव्हिड समन्वयक महेश राजदेरकर, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अविनाश सावंत , माहिती जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर,आरोग्य अधिकारी बाळाजी हळदेकर आदी उपस्थित होते.